सुविधा सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), खेड, जिल्हा सातारा या संस्थेचा भूखंड गहाणमुक्त करण्यास मंजूरी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**शासन निर्णय क्र .घबांक २१२५/प्र.क्र. १८०/१९-स,**

हौसिंग सेल, कुशेश मेन्शन, दुसरा मजला,
२२ कावसजी पटेल मार्ग जन्मभूमी मार्ग, फोर्ट,
मुंबई ४०० ००१

**दिनांक : २४ एप्रिल, २०२६.**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/1 ला/१८-सी, दि. २८/०९/१९९३
२) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/1 ला/१८-सी, दि. २५/११/१९९३
३) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/२ रा/१८-सी, दि.२९/०९/१९९४
४) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/२ रा/१८-सी, दि. १५/१०/१९९४
५) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/३ रा/१८-सी, दि. १८/०८/१९९५
६) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/1 ला /१८-सी, दि. १४/१२/१९९५
७) शासन निर्णय क्र. एचएसजी-१०९३/९७९/२ व ३ रा /१८-सी, दि. ०१/०३/१९९६
८) संस्थेचा प्रस्ताव दिनांक ११/११/२०२४.

**प्रस्तावना :-**

सुविधा सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), खेड, जिल्हा सातारा या संस्थेतील एकुण ६८ पात्र सभासदांना संदर्भाधिन शासन निर्णय क्र. १, २, ३, ४, ५,६ व ७ अन्वये एकूण कर्ज रुपये ६५,५७,४८०/- (रुपये पासष्ट लाख सत्तावन्न हजार चारशे ऐंशी फक्त) इतके वितरित करण्यात आले होते.

सुविधा सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), खेड, जिल्हा सातारा या संस्थेच्या सर्व ६८ सभासदांनी त्यांना वितरीत केलेली कर्जाची रक्कम त्यावरील व्याजासह शासनास परतफेड करून ना-देय प्रमाणपत्र प्राप्त केली आहेत. संस्थेच्या सर्व सभासदांच्या ना-देय प्रमाणपत्रांवरून व या कार्यासनातील खतावणीमधील नोंदीवरुन संस्थेला दिलेले कर्ज व्याजासह वसुल झाल्याचे दिसुन येते. संस्थेकडे शासनाचे येणे बाकी नसल्यामुळे संस्थेचा भूखंड गहाणखतातून मुक्त करण्यासंदर्भात संदर्भ क्रमांक ८ अन्वये संस्थेने सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर बाब विचारात घेऊन शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-**

सुविधा सहकारी गृहनिर्माण संस्था (म.), खेड, जिल्हा सातारा या संस्थेच्या एकूण ६८ सभासदांना वितरीत करण्यात आलेले गृहबांधणी कर्ज रुपये ६५,५७,४८०/- (रुपये पासष्ट लाख सत्तावन्न हजार चारशे ऐंशी फक्त) त्यावरील व्याजासह शासनास परतफेड केली आहे. सबब, सदर

संस्थेकडे शासनाचे कोणतेही येणे बाकी नसल्याने संस्थेने शासनाकडे गहाण ठेवलेला गहाणखतामध्ये नमुद केलेला अशोकनगर, खेड, ता. कोपरगाव, जिल्हा सातारा येथील सर्वे नं. ३५-३अे/१बी (नविन सर्वे नं. ७१-३अे/१बी) मधील प्लॉट नं. १ ते ५ आणि प्लॉट नं. २२ ते २८ (एकूण १२ प्लॉट) असे एकुण क्षेत्रफळ ३८१७ चौ.मी. इतका खालीलप्रमाणे चतु:सीमा असलेला भुखंड व त्यावरील बांधकाम गहाणखतातुन मुक्त करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेकडे | : | श्री रमेश अनंत पवार यांची जागा, |
| पश्चिमेकडे | : | जिल्हा परीषदेचा रस्ता |
| उत्तरेकडे | : | प्रतिष्ठानगर |
| दक्षिणेकडे | : | (के.आर.बी.सी.) शासकीय जागा |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०४२४१५३२११७१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI

Digitally signed by VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=f8392d872b7180812a91876993d519e95c3e41444d8d93ecaac6a9b51c69838f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C0422C17B24964BFB1F10270074369C4888C02315C6A4C050EAA332B556F90EA, cn=VIJAYA DHUNDAPPA SANGSHETTI
Date: 2026.04.24 15:34:01 +05'30'

**( विजया संगशेट्टी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई-०१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य नागपूर-०२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), (२ प्रती)
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे.
६) संचालक, विमा संचालनालय, मुंबई गृहनिर्माण भवन (म्हाडा) खोली क्र. २६४, पहिला मजला, बांद्रे (पुर्व) ४०० ०५१.
७) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जि. सातारा.
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा, जि. सातारा.
९) जिल्हा विशेष, लेखापरिक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, सातारा, जि. सातारा.
१०) अध्यक्ष, सुविधा सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) , खेड, ता. कोरेगाव जिल्हा सातारा.
११) निवडनस्ती